(दादा वि. देऊबाई)

**प्रतिवादी क्र. ५ तर्फे सा.क्र.१**

**सरतपास प्रतिवादी क्र. ५ तर्फे विधीज्ञ श्री. एम. बी. शेळके यांच्यामार्फत-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ९० मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे. मी माझ्या शपथपत्रासोबत खालील कागदपत्रे जोडलेले आहेत.

१. खरेदीखत क्र. ७६४/२०१० ची मुळ प्रत नि.क्र. ९३

२. कब्जेपावतीची मुळ प्रति नि.क्र. ९४

सरतपास पुर्ण.

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन. जी. तनपुरे यांच्यामार्फत-**

२. माझ्या पत्नीचे वय माझ्यापेक्षा कमी आहे. मी माझ्या पत्नीच्या आजारपणाबद्दल कुठलेही वैद्यकीय कागदपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी धरधाकट व चांगली आहे. मी पिंपळगाव फुणगी येथील रहिवाशी आहे. मी त्यासंदर्भात रहिवाशी दाखला दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वावरत जांभळी येथील रहिवाशी आहे. मला दाव्यासंदर्भात व दावा मिळकतीबाबत माहिती आहे. प्रतिवादी देऊबाई हि माझी नातेवाईक लागते. खरेदीखताच्या वेळेस देऊबाई यांचे वय अंदाजे ६०-६५ असेल. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी देऊबाई यांना वयोवृध्द व आजारपणामुळे कुठलाही व्यवहार कळत नव्हता.

३. माझा व प्रतिवादी क्र. २ भगवंता यांचा चांगला परिचय आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळेस देऊबाईने प्रतिवादी क्र. ३ दशरथ खेमनर यांच्यासोबत खरेदीखत केले त्यावेळेस मी प्रतिवादी क्र. २ भगवंता यांच्यासोबत होतो. वादीने केलेला दावा खोटा असून तो मला मान्य नसल्याचे मी खोटे सांगत आहे. वादीने दाव्यातील कथने ही खोटे नमूद केल्याचे मी खरेदीखत झाले असल्यामुळे कथन करत आहे. सदर दावा दाखल झाल्यानंतर वादीने लिज पेंडन्स नोंदवल्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला फसवण्यासाठी आम्ही केवळ पोकळीस्त व बिनकब्जाचे खरेदीखत केले. प्रतिवादी देऊबाई यांना काय आर्थीक अडचण होती हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी देऊबाई हिला खरेदीखताच्या वेळेस आर्थीक अडचण असल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही

की, मी खोटी ताबापावती तयार केली. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर कधीही प्रतिवादी क्र. ३ दशरथ खेमनर याचा ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर मी गट क्र. २१४ मधुन पाणी आणल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर माझा ताबा नसल्याकारणे वादींनी मला हरकत अडथळा केल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ वर मी खोट्या नोंदी केल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीशी वादीचा कुठलाही संबंध नसल्याचे व मी खरेदीखत करून घेतल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर आजरोजी वादी, आण्णा तोरे व संजय तोरे यांचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिवाणी दावा क्र. ३३२/२०१० मध्ये न्यायालयीन आयुक्त नेमलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर न्यायालयीन आयुक्ताच्या अहवलात वादग्रस्त मिळकतीवर वादी व आण्णा तोरे यांची वहिवाट असल्याचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीवर माझी वहिवाट असल्याचे मी खोटे नमूद केले आहे.

४. दिवाणी दावा क्र. ३३२/२०१० मध्ये या न्यायालयात माझी पत्नी वादी हिचा नि.क्र. ५ चा अर्ज मंजूर झाला होता. त्याविरूध्द जिल्हा न्यायालयात अपील होवून सदर नि.क्र. ५ चा आदेश खारीज करण्यात आला. सदर निकालाविरूध्द आम्ही मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर याचिका माझ्या पत्नीने काढुन घेतली. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीचे पोकळीस्त साठेखत व खरेदीखत झाले. मी आठवीपर्यंत शिकलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकुर हा मी कुठलीही माहिती न देता माझ्या वकिलांनी तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR
Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.02.23 16:26:39 +0530

(मयुर ए. पवार)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.

दिनांक:-२३/०२/२०२६.